# प्रेस नोट

ला.प्र.वि,वाशिम.

दि.३१/०७/२०२५

खाजगी इसम शिवराज श्रीपद पंडीत, वय–६० वर्षे धंदा– वाईन्डर,रा.सवड ता.रिसोड जि.वाशिम यांना लाच स्विकारले प्रकरणात ताब्यात घेउन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | खाजगी इसम शिवराज श्रीपद पंडीत, वय–६० वर्षे धंदा– वाईन्डर,रा.सवड ता.रिसोड जि. वाशिम |
| लाच स्विकारल्याची रक्कम | २०००/– रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तहसिल कार्यालय रिसोड येथे तक्रारदार व तक्रारदार यांचे भावाची पुढील आठ महिन्याची हजेरी बंद करण्यासाठी २०००/– रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले आहे. |
| सापळा अधिकारी | बालाजी तिप्पलवाड, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

दि.३०/०७/२०२५ रोजी तक्रारदार पुरुष वय ३५ वर्ष यांनी तक्रार दिली की;नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय रिसोड यांच्या कार्यालयात काम करणारा,शिपाई शिवराज पंडीत यांनी तक्रारदार व तक्रारदार यांचे भावाची पुढील आठ महिन्याची हजेरी बंद करण्यासाठी ३०००/– रुपये लाचेची मागणी करत आहेत अशी तक्रार दिली.

दि.३०/०७/२०२५ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना ३०००/– रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती २०००/– रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

दि.३०/०७/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम शिवराज श्रीपद पंडीत, धंदा– वाईन्डर,रा.सवड ता.रिसोड जि.वाशिम यांनी तक्रारदार यांना सांगीतले की, २०००/– रुपये लाच रक्कम ही तेथे अचानक तहसील कार्यालयात आलेल्या पंडीत यांच्या गावच्या इसमाजवळ दयावी त्यामुळे तक्रारदार यांनी २०००/– रुपये लाच रक्कम ही सदचे इसमाजवळ जवळ दिली व ती त्यांनी पंडीत यांचे सांगणे वरुन स्विकारल्याने आरोपी कडुन लाच रक्कम २०००/–रुपये हस्तगत केली. आरोपी विरुध्द सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ चे कलम ७A प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक,श्री मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री सचिंद्र शिंदे, ला.प्र.वि. अमरावती, यांचे मार्गदर्शनात व पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री जगदीश परदेशी ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम यांचे सह तपास अधिकारी पोलीस निरीक्षक बालाजी तिप्पलवाड यांचे पथकातील कर्मचारी पोहवा आसिफ शेख,विनोद मार्कंडे,योगेश खोटे,चापोकॉ नावेद शेख ला.प्र.वि.वाशिम यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने,खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो,वाशिम दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल क्रमांक – ७०२०१५५३११ यावर संपर्क साधण्याचे आवाहन बालाजी तिप्पलवाड पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,वाशिम यांनी केले आहे.

( बालाजी तिप्पलवाड )
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.